MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan To March 2020
Issue-32, Vol-04

Date of Publication
1 March 2020

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# INDEX

01) The Eightfold Path : A Way of Eradication Dukkha of Human Beings
**Dr. Subhash A. Athawale, Dhule, M.S.** ||14

02) Corona virus: Meaning, History and Challenges
**Prof.Dr. Kailas Baban Ingle, Dist. Buldhana, Maharastra** ||17

03) Biochemical changes in blood during Trypanosomaevansy infection of ...
**Rajni Johari & Dr. C. S. Shriwastva, Khandwa(M.P.)** ||19

04) IMPACT OF NON-PERFORMING ASSETS ON WORKING OF BANKS WITH SPECIAL ...
**Md. Juber, Bhagalpur, Bihar** ||22

05) Sexism and Racism in Alice Walker's "The Color Purple"
**KANSENG SHYAM, DIBRUGARH UNIVERSITY** ||26

06) A new species of Dinemasporium Lev.from Melghat forest (Maharashtra)
**P. S. Kaste, Distt.Amravati (M.S.)** ||28

07) Relationship between Musician and Audience
**Dr. Maneesha Kulkarni, Mumbai** ||29

08) MORAL AND RELIGIOUS PROBLEMS OF ADOLESCENTS
**Dr. Varsha Kulkarni, Beed** ||32

09) A Marxist Reading of Indian Renaissance
**A. U. Mundhe, Udgir** ||35

10) Teachers' Professional Commitment: A Mean to Improve the Quality of ...
**Dr. NAUSHAD HUSAIN & Dr. AFAQUE NADEEM KHAN, Hyderabad** ||36

11) History, Development and Application of Fixed Point Theory
**Chetan Kumar Sahu & Dr. Shubhashish Biswas, Raipur(C.G.)** ||45

12) A STUDY ON CONSUMER BEHAVIOUR AND CONSUMPTION PATTERN OF ...
**SUPRIYA PATHAK, LUCKNOW** ||50

13) Nadime Gordimer as short story writer
**Vishnu Pundali Shekokar & Dr. MANGESH ADGOKAR, Jhunjhunu** ||58

www.vidyawarta.com/03 _ http://www.printingarea.blogspot.com

14) GROUND WATER RESOURCES IN MAHARAJGANJ DISTRICT- U.P.
**DR. J. P. SINGH, Maharajganj - U.P.** ||62

15) THEMES IN NATHANIEL HAWTHORNE'S THE SCARLET LETTER
**Dr. Markas Laxman Sonawane, Dist. Aurangabad (Maharashtra)** ||68

16) खानदेशातील आदिवासी लोकजीवनात मोह वृक्षाचे महत्व
**प्रा.डॉ. रमाकांत अंबादास चौधरी, जि. धुळे** ||71

17) कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा खून झालेल्या पिडीत कुटुंबाची वर्तमान जीवनशैली
**डॉ. गणेश आर. गाडेकर, यवतमाळ** ||73

18) अस्मिता योजनेमुळे किशोरवयीन मुलींच्या आरोग्यावर झालेला परिणाम
**डॉ. राहुल जी. गोंडाणे, यवतमाळ** ||78

19) मराठा घराण्यातील स्त्रियाचे लोकोपयोगी व सार्वजनिक हिताची कामे - एक दृष्टिक्षेप
**प्रा. डॉ. रमेश धनराज जाधव, जि. धुळे** ||83

20) जागतिक परिप्रेक्षात होणारे बदल व भारतीय भाषांसमोरील आव्हाने
**डॉ. श्रीकृष्ण काकडे, अकोला** ||86

21) पर्यावरण रक्षणाचा प्रयत्न
**प्राचार्य डॉ. एस. के. खंगार, गडचिरोली** ||88

22) मानवी स्थलांतरामुळे निर्माण झालेल्या सामाजिक समस्यांचे मानसशास्त्रीय अध्ययन
**प्रा.डॉ. मोरे रविंद्र विठ्ठल, जि. धुळे** ||90

23) डॉ.बाबासाहेब आंबेडकर : लोकशाहीत विरोधी पक्षसंबंधी विचार
**भगवान ईश्वरलाल परदेशी, जि. धुळे** ||93

24) सोशल मिडीयामुळे जीवनाला मिळतोय सोशल टच
**रमेश अर्जुन पवार, सोलापूर** ||96

25) शिरपूर शहरातील अध्यापक विद्यालयातील छात्रअध्यापकांचा संगणक वापराविषयीच्या भितीचा ...
**डॉ. पुराणीक विजेंद्र श्रीकृष्ण, जि. धुळे** ||98

26) मराठी विषयाच्या माध्यमातून जीवन कौशल्ये विकसित करून परिणामकारकता ...
**भीमसिंग बालुसिंग राठोड & डॉ. आशा धारस्कर (भावसार), अकोला** ||100

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

27) इक्किसवीं सदी के महिला उपन्यासों में स्त्री चेतना
झेलम चंद्रकांत झेंडे, जि.रायगड महाराष्ट्र ||106

28) उत्तरकाशी जिला सहकारी बैंक में कार्यशील पूँजी के विश्लेषणात्मक घटकों ...
डॉ० आशुतोष कुमार, उधम सिंह नगर, उत्तराखण्ड़ ||108

29) विश्व कठिन परिस्थितियों के दौर से गुजर रहा है सिर्फ एक मात्र उपाय अध्यात्म
डॉ. पुष्प राज गौतम, परसा ||116

30) बिहार में मंडल कमीशन के दौरान आर्थिक सामाजिक परिवर्तन हुए (१९९० ...
डॉ. विद्यापति गौतम, फिरोजाबाद, यूपी ||118

31) राष्ट्रीय एवं अन्तर्राष्ट्रीय आतंकवाद: एक गहन विश्लेषण
डॉ० राकेश इस्टवाल, पौड़ी गढ़वाल, (उत्तराखण्ड) ||125

32) भारतीय राजनीति में वंशवाद की राजनीति का एक अवलोकनात्मक अध्ययन
डा० जगमोहन सिंह नेगी, गोपेश्वर (चमोली) ||130

33) हिन्दी भाषा-साहित्य की समृद्धि में दक्षिण का योगदान
डॉ. ए. सन्यासि राव विशाखपट्टणम ||135

34) ज्ञानेन्द्र पतिकी कविताओं में पर्यावरण विमर्श
प्रा.डॉ. सुनील एम. पाटिल, जिला धुलियाँ ||138

35) 'किन्नर' उत्स, निर्वचन एवं साहित्यिक दृष्टि
डॉ. श्रवण कुमार, जोधपुर ||140

36) सामाजिक समानता से सशक्त राष्ट्र के प्रणेता – डॉ. भीमराव रामजी आम्बेडकर
शिवु कुमार, हिमाचल प्रदेश ||146

37) शिक्षा में ग्रंथालय एक ज्ञान मार्ग
प्रा. वर्षा अ. तिडके(शनिवारे), गडचिरोली ||152

38) औषधीय वनस्पतियों के विकास तथा संरक्षण की समस्याएँ एवं सरकारी नीतियों ...
डॉ० मनीषा तिवारी & पूनम, नैनीताल, उत्तराखण्ड ||154

39) हिंदी साहित्य जगत के अविस्मरणीय कलमकार
हेमंत कुमार यादव, जिला – उत्तर परगना, (पश्चिम बंगाल) ||160

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

40) बलिया बेसिन कुमाऊँ (लघु) हिमालय की परम्परागत कृषि में जलवायु परिवर्तन ...
**मोहन सिह सम्मल, नैनीताल, उत्तराखण्ड** ||166

41) मेडिकल व इंजीनियरिंग की प्रवेश परीक्षा हेतु कोचिंग लेने वाले विद्यार्थियों की ...
**डॉ. मूलचन्द मीना & प्रो. सरोज गर्ग, उदयपुर राज.** ||177

42) IoT ENABLING TECHNOLOGIES AND ITS APPLICATIONS
**Dr. Maroti Uddhaorao Tiple, Dist-Gadchiroli** ||183

43) FOREIGN DIRECT INVESTMENT AND FOREIGN INSTITUTIONAL.WITH IMPACT ON ...
**Prof. B. S. Hokarne & Prof. S. S. Dengale, Dist: Latur(MS)** ||187

44) गांधी विचारातील नैतिकता : आजचे वास्तव
**प्राचार्य डॉ. किरण सावे, पालघर** ||190

45) स्त्रीवादी चळवळ
**डॉ. आर. व्ही. ढेरे, जि. पुणे** ||194

46) बदलत्या ग्रामीण विकास प्रक्रियेत आधुनिक डिजिटल क्रांतीचा सहभाग
**डॉ. अरविंद के. राऊत & विश्वजीत गो. नरवाडे, जि. जळगाव** ||196

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) **Mob.09850203295**
E-mail: vidyawarta@gmail.com
**www.vidyawarta.com**

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

farmer. They are of the view that multi brand retailer will have their own market while local farmer will continue with their available market without much change in it. The rest 25% of the farmer of the view that multi brand retailer will reduce the purchase from local farmer because the multi brand retailers will make a switch over to commission agent. The left over 10% were not having the detail information about the recent issue.

**Conclusion:**

It is obvious that India, being a member in WTO, it has allowed FDI in Multi-brand retail also. From the above discussion, it can be drawn that though the small retailer are not so apprehensive about the big stores. In India we have 11 shops per 1000 people and 1.2 crore shops, which gives employment to about 5 crore people. Allowing this major FDI will bring new technology to India and it will bring proper refrigeration technology so that wastage of food or grains can be stopped. Why we are not passing 'Food Security Bill' which is still in the parliament. It is concluded that the decision taken by the Government to allow 51% FDI in Multi-brand Retail of India is a boon to its economy. but required the things for achieve FDI in multi brand retail sector India as on Increased sourcing of farm produces by local farmers, product sources from same state, any Tax, service charge on farm production is not dedication.

**References:-**

1. Ahluwalia M.S. "FDI in multi-brand retail is good, benefits famers" The Times of Indian, http:// timesofIndia.indiatimes.com
2. World Bank (2010), 'Investing Across Borders - A Survey of 87 Economies'.
3. World Bank (2010), 'Doing Business' Various Issues
4. FDI in key sectors are detrimental of economy –The Hindu news paper
5. Farming community in support of FDI in retail- Times of India
6. http://www.wspacking.com
7. Google search engine

**44**

# गांधी विचारातील नैतिकता : आजचे वास्तव

**प्राचार्य डॉ. किरण सावे**
सोनोपंत दांडेकर कला, व्ही. एस. आपटे वाणिज्य आणि एम. एच. मेहता विज्ञान महाविद्यालय पालघर

**********

**प्रस्तावना :**

आज घडीला भारताच्या स्वातंत्र्याला बराच काळ लोटला आहे. आधुनिक भारत सर्वच क्षेत्रात पुढे पुढे जात आहे. मानवी उत्क्रांती व विज्ञानवाद, धर्मवाद, समाजवाद, सत्य, अहिंसा, समता, बंधुता, न्याय, व सार्वजनिक जीवनातील नैतिकता यासंबंधी जेंव्हा जेंव्हा चर्चा होते, तेंव्हा गांधीजींची शिकवण व त्यांच्या तत्वज्ञानाची ही सर्वांगांनी समिक्षा होते त्याची उपयोगिता व प्रासंगिकता तपासली जाते.

भारत हे धर्मनिष्ठ राज्य नसले तरी भारताने धर्म नाकारला नाही. लोकशाही परंपरेत एका विशिष्ठ अर्थाने धर्मवादाला काहीच स्थान नाही म्हणून धर्माला भारतीयांच्या जीवनात काहीच स्थान नाही असे नव्हे किंबहुना धर्म, देव व देश यांसी भारतीय समाज जीवन पुर्णपणे मिश्रित झाले आहे. गांधीजी धर्मनिष्ठ होतेच पण धर्मवादी नव्हते. त्यांची देशभक्ती व धर्मनिष्ठा एकच होत्या.

गांधीजी धर्माच्या संकल्पनेत मानवता हा सर्वात महत्वाचा आधार होता व जिथे मानवता **(Humanity)** असत नाही तिथे धर्म व त्या धर्मांची शिकवण अर्थहीन आहेत. एखाद्या धर्माची तत्वे व ग्रंथ प्रमाण्य फक्त त्या ग्रंथामध्येच त्या पुरतेच मर्यादीत असेल तर त्या ग्रंथ व नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्तच होणार नाही. धार्मिक तत्वे ही मानवतेच्या आचरण पातळीवर स्विकारली जाऊन तपासली गेली पाहीजेत असे करतांना धर्म, राष्ट्र व जाति यामध्ये नितिमत्तेच्या स्ववर्तनाद्वारे जगाला अत्यंत

महत्वाचा मार्ग दाखवला आहे. एखाद्या तत्वज्ञानाचे सार मानवता आहे मात्र आचरणात विरोधाभास असेल तर त्या धर्माला व तत्वज्ञानाला काहीच अर्थ उरत नाही. धार्मिक तत्वांचा अंगिकार अगदी सामान्य माणसे सुद्धा करू शकतात यासाठी गांधीजींनी त्यामागचे मोठे महत्वपुर्ण सुत्र सांगितले आहे. मानवतेचा खऱ्या आर्थाने पुरस्कार करण्यासाठी मन, वाणी व कृती ही महत्वाची साधने आहेत व त्याचा योग्य वापर करून मानवी जीवनाचे उन्नयन साधणे हे साध्य आहे. सर्वजण सुखी झाले पाहीजेत. स्वार्थ, अहंकार, हिंसा, व्देष, वासना,घृणा नष्ट होवून उत्कट जीवन जगता आले पाहीजे यासाठी वैयक्तिक आचरणातील नितिमत्ता व विचार आचारांची नैतिकता व तिचे आचरणातील सातत्य व प्रतिबद्धताच प्रत्येकाला सुखी बनवू शकते असे गांधीजींना वाटे.

''जास्तीत जास्त लोकांचे भले करणे व त्यासाठी जास्तीत जास्त त्यागाची भावना तसे कृत्य (कृती) करत जाणे हाच खरा मार्ग आहे.''

क्षेत्र सामाजिक, धार्मिक, राजकीय किंवा कोणतेही असो नैतिकतेचा मार्ग हा निश्चित आसला पाहीजे व त्यासाठी मनात त्यासंबंधीची प्रतिबद्धधता चिरंतन ठेवता आली पाहीजे.

राजकीय क्षेत्रात धर्मविहीत राजकारण शक्य नाही मात्र नितिशुन्य राजकारणही अर्थहिन व अत्यंत घातक आहे. असा विचार सर्वोदयाच्या संकल्पनेद्वारे त्यांनी प्रस्थापित केला.

देशाला केवळ स्वातंत्र मिळवून देणे हे त्यांच्या जीवन व कार्यशैलीचे, चळवळीचे उदिष्ट नव्हते. समस्त मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवून धार्मिक व अध्यात्मवादी विचारांचा आपल्या वाणी व कृतीतून आचरणव्दारे सामाजिक, आर्थिक, राजकीय चित्र बदलणे ही त्यांची मुख्य भुमिका होती.

गांधीजींच्या ह्दयात समस्त मानव जाती बद्दल एकसमान प्रेम होते. सर्वांची सेवा करणे व सर्वांच्या जीवनाचे कल्याण करणे हेच त्यांच्या जीवनाचे अंतिम लक्ष्य होते.

त्यांच्या मनात गरीब, अनाथ, असहाय यांच्या विषयी विशेष संवेदना होती. समाजातील उच्चनिचता, गरीबी, अत्याचार व सर्वच प्रकारची असमानता मिटविण्यासाठ आपल्या वर्तनाव्दारे धार्मिक तत्वांचाच आधार घेवून ते लोकांना प्रभावित करत. केवळ धार्मिक शिकवण व वचनाद्वारे सामाजिक बदल घडू शकत नाही. केवळ भाषणाने प्रवचनाने किंवा केवळ कायद्याने संवेदनशील व नितिमान समाज निर्माण होऊच शकत नाही. यासाठी स्वआचरणातून व स्वत:च्या नैतिकतेने समाजाला प्रकाशित करण्याचा प्रयत्न त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येतो.

प्रत्येकाने प्रत्येकाशी समानतेने व समतेच्या भावनेनेच वागले पाहिजे ही त्यांची आंतरिक भावना होती व तसाच त्यांचा पिंड होता. मात्र तात्कालीन समाजातील विषमता व अस्पृश्यता, जाती व वर्णभेद या अत्यंत वाईट परंपरांनी समाजाला व सामाजिक वातावरणाला मलीन रूप आणले होते. दिनदलित व अस्पृश्यांच्या प्रति उच्चवर्णियांच्या मनात असलेली दुर्भावना समुळ नष्ट झाली पाहीजे या भावनेने ते आपल्या प्रवचन व भाषणांना धार्मिक चौकटीतच राहून प्रचंड विरोध करू लागले. यासाठी केवळ उपदेश न करता त्यांनी दलित मुलगी समवेत ठेवली व ते तिच्याच हाताने जेवन घेवू लागले. कॉग्रेस पक्षाचे तत्कालीन नेते व धुरिणांनी अस्पृश्यांच्या एकातरी मुलाचे पालकत्व घ्यावे अशी अटच त्यांनी कॉग्रेसजनांना घातली यावरून स्व आचरणातून नैतिकतेचे प्रगल्भ अधिष्ठान निर्माण करून दिले.

लेखन, चिंतन, मनन, अभ्यास व भाषण हे ज्ञान प्रक्रियेच्या देण्याघेण्याचे महत्वाचे घटक आहेत मात्र त्याच प्रक्रियेत आचरण हा घटक नसेल, स्व आचरण हा त्या प्रक्रियेचा घटक नसेल तर वरील कोणत्याच घटकाला नैतिक अधिष्ठान मिळत नाही म्हणून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक एव्हढेच नाही तर पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी आपल्या वर्तनाला नैतिकतेचे भक्कम अधिष्ठाण असलेच पाहीजे तरच डोळ्यात भरतील, असे बदल दिसायला लागतात. त्याबाबतीत गांधी विचारवंत होण्याआधी 'आचारवंत' होते. केवळ एखादा सिद्धांत मांडून काम झाले असे नव्हे तर त्या 'थिअरी' चा **(Practically)** व्यवहार्य वापर गांधीजींनी वेळोवेळी केला आहे.

आंधळेपणाने भौतिकवादाच्या मागे लागून

उपभोगवाद व चंगळवादाच्या आहारी जावून पर्यावरणाच्या व सामाजिक स्थैर्याच्या नाशाला आपणच कारणीभूत आहोत. शांततामय सहजीवन वाढविण्यासाठी/ टिकविण्यासाठी इंद्रिय व मन यावर नियंत्रण मिळविण्यासाठी गांधी विचार व निसर्गशैली अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. स्वत: बॅरीस्टर असूनही अत्यंत सहज साध्या राहणीमानाद्वारे भारतीय समाजाला त्यांनी आजही आवश्यक असणारे संदेश स्ववर्तनाच्या नैतिकतेतून घालून दिले आहेत.

अत्यंत वेगाने होणारे पर्यावरणाचे नुकसान समस्त नागरी समूहाच्या विनाशाला कारणीभूत ठरणार आहे. गांधी विचार व आचारातील सूत्र मानव जातीला व या पर्यावरणाच्या रक्षणालाही सहाय्यभूतच ठरणार आहे.

पाणी वाया न जावू देणे, कागदांचा अत्यंत कमी वापर करणे, स्वत:चे संडास स्वत:च स्वच्छ करणारे, आपली कुटी आपल्या हाताने सारवणे, शरीरश्रमाला प्रतिष्ठा देणे, स्वच्छिक साधेपणाने राहणे हे त्यांनी स्व आचरणातून जगाला दाखवून दिलं की, विकासनीती व स्पर्धा तसेच सध्याची जीवनशैली आपल्याला विनाशाकडेच घेवून जाईल व भारत गांधीच्या विचारांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. पर्यावरणाच्या होत असलेल्या विनाशाकडे आपण गांधी विचार व आचारातून बघण्याची गरज निर्माण झाली आहे.

**सहिष्णूता व समष्ठीसाठी गांधी हवेच आहेत :**

अधिकच्या स्वतंत्र जाणिवांमुळे भारतीय समाजात अस्तित्वासाठी व खोट्या अस्मितेसाठी अनेक छुपे व काही उघड संघर्ष सुरू आहेत. जाती, धर्म, वर्ण, प्रदेश, भाषा अशा विविध रूपातील संकुचित अस्मिता वेगाने डोके वर काढत आहेत पण समग्र भारतीयांना एकत्र बांधून ठेवणारा गांधी विचार आजही सामाजिक समता व सहिष्णूतेसाठी किती आवश्यक आहे मागील काही घटनांवरून दिसून येत आहे. नौखालीत झालेल्या धार्मिक दंगलीत जिथे सैन्याकडेही तिथे जाण्याचे आत्मबल नव्हते त्या विचारात गांधीनी पाय ठेवले व तो विखार त्यांनी विझवला. त्यांच्यातील आत्मबलाची नैतिकता ही किती नितीमान होती हेच त्यावरून दिसून येते. दंगली रोखणे व थांबविण्यासाठी एव्हढे आत्मिक व नैतिक बल असलेला राजकारणी किंवा समाजकारणी आपवादानेही सापडणे कठीण आहे.

सहिष्णू बंधुत्वाचे विचार 'वसुधैव कुटूबंकम' हे समग्र मानव जातीचे कल्याणाचे सूत्र केवळ उद्गारण्याने उपयुक्त होणार नाही त्यासाठी आचरणाची नैतिकतेची चौकट मजबूत आसावी लागेल.

गांधीजींचे तत्वज्ञान आचरणासाठी अवघड आहेच पण त्याच्या अनुसरणाने वैयक्तिक व्यक्तीगत विकास तर होतोच शिवाय आदर्श समाजाची निर्मिती होते. गांधीजींच्या विचार व आचारात कुठेही विरोधाभास आढळत नाही आपल्या विचाराप्रती आचरणातून त्यांनी दाखविलेली बांधिलकी व दश्ढता समस्त मानव जातीला दिशादर्शक आहेच शिवाय समस्त मानवी जीवनाच्या उत्थानासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**अहिंसा व सत्याचरणाने भारत किर्तीमान निर्माण करेल :**

अहिंसा व सत्य ही गांधी विचारातील मुलभूत तत्वे आहेत. ती व्यक्तीच्या सर्वांगिण स्वास्थ्य व विकासासाठी आवश्यक आहेत तसेच कौटूंबिक व समग्र समाजाच्या स्थैय, विकास व उन्नयनासाठी आवश्यक आहेत अशीच त्यांची धारणा होती.

अहिंसा व सत्यविचाराने सद्वर्तन हा एक धर्म आहे. व या सद्वर्तनामध्ये अहिंसा व ब्रम्हचर्याची उत्पत्ती सत्य मार्गाने होते. या सत्यविचारातूनच मन, वचन व कर्म यांचा मेळ घालायचा असतो. त्यातूनच पुढे व्यक्तीच्या व्यक्तीमत्वात आंतरिक गुण — गुणतज्ञा, आशा (इच्छा) व प्रेम या सद्गुणांची वृद्धी होते. आपल्या वर्तनाने पशुत्व व राक्षसी प्रवृत्ती व मानवता यातील फरक आपल्या लक्षात येतो.

**मानवसेवा :**

जोपर्यंत मानव स्वार्थी आहे तोपर्यंत त्याच्या मध्ये सेवेची भावना होणार नाही व सेवाभाव नसेल तर हिंसा व लालसा अधिक गतिने वाढत जाईल. गांधीजींनी आपल्या जीवनाला मानव सेवेची जोड दिली. सर्व सजीवांप्रती असलेली संवेदना व सेवाभाव त्यांच्यात वसत असलेल्या मैत्री, करूणा व सहिष्णूता याचाच परिपाक आहे.

आफ्रिकेत असतांना त्यांच्या घरी एक हरिजन आला तेव्हा संडास कुणी स्वच्छ करायचा यासाठी त्यांनी आपल्या पत्नीला तसे सांगितले. व्यक्ती ती कोणीही असो आपल्या ठायी खरा सेवाभाव व आंतरीक बंधुभावाची समतावादी दृष्टी असेल तर कोणत्याच कर्मात हिनता व दिनता वाटण्याचे कारण नाही व तसे कारण असू नये यासाठी ते आग्रही असत.

**धर्मनिरपेक्षता :**

गांधीजींच्या विचारातील व आचारातील धर्म व प्राचीन धर्म संकल्पना व तत्वे पूर्णत: भिन्न आढळून येतात. धर्म म्हणजे केवळ कर्मकांड आहे असे नव्हे तर धर्माचा संबंध व्यक्तीच्या आचरण व्यवहाराशी आहे. दुसऱ्या धर्माकडे त्यांचा पाहण्याचा उदारवादी, समतावादी दशष्टिकोण आजही समस्त वैश्विक मानवी समुदायाला प्रेरक आहे, असे त्यांना वाटे. 'ईश्वर अल्ला तेरो नाम सबको सन्मती दे भगवान' हि त्यांची आर्त हाक त्यांच्या विचारांची ग्वाही देते.

सर्वच धर्मात मानवतावादी विचार आहेत 'धर्म ही बुद्धीने आकलन होणारी वस्तुच नाही तो हृदयालाच कळतो तो आपल्याला परका नाही. आपल्या अंतरात्म्यातून जिचा विकास करत न्यावयाचा असतो अशी ती वस्तु आहे. (धर्मविचार — १, पृ. २८)

धर्म ही प्रत्येकाची खाजगी बाब असली तरी तिची उपयोगिता व्यवहारावर अवलंबून आहे म्हणून त्यांनी म्हटले आहे, 'तो धर्म व्यवहारातल्या गोष्टींची दखल घेत नाही आणि त्या सोडविण्याला उपयोगी पडत नाही तो धर्मच नव्हे' बाह्य कर्मकांडापेक्षा शुद्ध अंत:करण हे धर्माचं खर स्वरूप आहे. जन्माजात धर्माची जी लेबल्स माणसाला चिकटलेली असतात, त्यापेक्षा तो कितीतरी उदार आणि सर्वव्यापी आहे.

आपल्या धर्मातील उणऱ्या उणिवा आपल्याला ओळखता आल्या पाहिजेत व त्या आपल्या वर्तनातून उण्या झाल्या पाहिजेत असा गांधीजींचा आग्रह होता; खिलाफत चळवळीला सक्रिय पाठींबा देवून धर्म कर्मकांडी असण्यापेक्षा तो तात्विक कसा असला व तो कसा सर्वव्यापी 'सर्वजन सुखाय' ठरणारा असला पाहिजे अशीच त्यांची आचारशैली होती.

देशाच्या फाळणी नंतर संपत्तीचे वाटप हे न्याय व सत्य मार्गानेच झाले पाहिजे ही गोष्ट काही राष्ट्रवाद्यांना आवडली नाही मात्र राजकारण्या अगोदर एक सहिष्णू व मानवतेचे पुजारी होते ते निव्वळ राजकारणी नव्हते; म्हणून त्यांची ही आचार विचार सरणी होती.

**निष्कर्ष :**

गांधीजींचा समता, विचार, सत्य, अहिंसा, ब्रम्हचर्य, धर्मनिरपेक्ष विचार हा समग्र मानव जातीसाठी अत्यंत उपयफकत आहे. केवळ भारतच नव्हे तर समस्त मानवजात, याने लाभान्वित झाली आहे, होत आहे. बहुधर्मी, बहुजातीय भारतासारख्या देशाला गांधीजींनी जी स्वत:च्या नैतिक आचरणाने सिद्ध जो धर्म दिला आहे त्याची उपयोगिता आजही तितकीच गरजेची आहे. गांधीजींचे वैयक्तिक व्यक्तीगत नैतिक विचार व वर्तन भारतीय समाजाला दिशा देणारेच ठरले आहे.

**संदर्भ :**

१. लोकसेवक/ प्रा. अमर साहेब/प्रशांत पब्लीकेशन्स, महात्मा गांधी व नेहरू यांचे समग्र तत्वज्ञान

२. गांधी उद्यासाठी/रूपांक दिलिप कुलकर्णी /राजहंस प्रकाशन / पृ. ५७९

३. Aspects of Gandhian Thought / Editor Himat Jheveri / p. 351 Mani Bhavan & Gandhi Sangrahalaya

४. गांधी विचार विथिका / सुरेंद्र प्रसाद अग्रवाल / Cocept Publishing Company / P. 157

५. महात्मा गांधीचे तत्वज्ञान/डॉ. रामेश्वर भिसे / प्रशांत पब्लीकेशन्स / पृ. १०७

६. Mahatma Gandhi – by Dr. Sarvapalli Radhakrushanan / Jaico Publishing House / P. 566

७. Gandhi M. K. (1968 – 1999) Conservative Program : "Its mining and Place" in the collected work of Mahatma Gandhi Vol. – 75, Ministry of Information of broad casting, government of India (Originally Published in 1971)

८. राष्ट्रीय गांधी संग्रहालय, नई दिल्ली, गांधी साहीत्य सुची, नई दिल्ली १९७६

९. नैतिक धर्म/मो. क. गांधी, नवजीवन प्रकाशन पृ. ४०

१०. एकविसाव्या शतकात गांधी/वासंती सोट / परंधार प्रकाशन पृ. १२०